नि. फौजदारी खटला क्र. **३०८/२०२२**
सरकार विरूद्ध किशोर गजानन व
अन्य एक
**निशाणी ४४**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ४ ची जबानी**
सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो/करते की,
माझे नाव : गणेश शंकरराव अवचार
वय : ५८ वर्षे,
धंदा : श्रेणी पोलीस उप—निरीक्षक
नेमणुक : दहिहांडा पोलीस ठाणे
राहणार : ह. मु. अकोला, ता. व जि. अकोला.

**सरतपासणी — अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. पी. एल. हरणे यांचेमार्फत —**

दि. ०९/०४/२०२२ रोजी मी दहिहांडा पोलीस ठाण्यात पोलीस सहा. पोलीस निरीक्षक म्हणुन कार्यरत होतो. सदर दिवशी मी, पो.कॉ. सिध्दांत मेश्राम, ए.पी.आय सुरेंद्र राउत व वाहन चालक काळे असे गस्त कर्तव्यावर होतो. आम्ही सरकारी दवाखाना दहिहांडा येथुन जात असतांना एक ट्रॅक्टर रेती घेउन जातांना दिसला. आम्ही सदर ट्रॅक्टर थांबवला व विचारपुस केली असता, आरोपी क्र. १ याने सदर रेती चांडोळा घाट येथुन घेउन रेल गावाकडे जात असल्याचे सांगितले. त्याला रेती वाहतुक परवान्याबाबत विचारले असता, त्याचेकडे परवाना मिळुन आला नाही. त्यामुळे सदर ट्रॅक्टरचा मी घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला व सदर ट्रॅक्टर पोलीस ठाण्यात नेला. सदर ट्रॅक्टरचा क्र. एमएच ३२ पी ३१२४ असा होता व ट्रॉलीचा क्र. एमएच ४० एल ८७८३ असा होता. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखवला त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. घटनास्थळ पंचनाम्यास **निशाणी ४५** देण्यात येते. आता मला जप्ती पंचनामा दाखवला. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. जप्ती पंचनाम्यास **निशाणी ४६** देण्यात येते. मी स्वत: आरोपीविरूध्द घटनेची फिर्याद दिली. आता मला फिर्याद दाखवण्यात आली. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. फिर्यादला **निशाणी ४७** देण्यात येते. आता मला प्रथम खबर अहवाल दाखवण्यात आला. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. प्रथम खबर अहवाल ला **निशाणी ४८** देण्यात येते. सदर गुन्ह्याचा तपास मला सोपवण्यात आला. तपासादरम्यान मी आरोपींना अटक केली. साक्षीदारांचे जाब—जबाब नोंदवले व तपासाअंती दोन्ही आरोपींनी गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने मी आरोपींविरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. आरोपी क्र. १ आज कोर्टासमोर आरोपीच्या पिंज—यात हजर आहे. **सरतपास पुर्ण.**

**उलटतपासणी — आरोपी क्र. १ तर्फे वकिल श्री. एफ. ए. काझी यांचे मार्फत.**

२. सध्या मी पोलीस उप–निरिक्षक म्हणुन कार्यरत आहे. घटनेवेळी मी सहा. पोलीस निरीक्षक म्हणुन कार्यरत होतो. मी गेल्या ३४ वर्षांपासुन सेवेत आहे. ज्याने फिर्याद दिली त्या पोलीस अधिका–याला तपास करता येत नाही याबाबत मला माहित नाही किंवा कसे याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत प्रकरणात मी फिर्याद दिल्यामुळे मला घटनास्थळ व जप्ती पंचनामा तसेच तपास करण्याचे अधिकार नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी गैरकायदेशीरपणे तपास केला.

३. हे म्हणणे खरे आहे की, मी फिर्याद देण्याच्या आधी जप्ती पंचनामा केला होता. सदर गुन्ह्यात गौण खनिज समाविष्ट असल्याबाबत मी संबंधीत तहसिलदार यांना माहिती दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, गौण खनिज संदर्भात गुन्हा दाखल झाल्यानंतर त्याबाबत माहिती संबंधित तहसिलदार यांना माहिती देणे गरजेचे असते. हे म्हणणे खरे नाही की, गौण खनिज समाविष्ट असलेल्या गुन्ह्यात तक्रार देण्याचा व तपास करण्याचा मला अधिकार नाही. प्रस्तुत गुन्ह्यात एक ब्रास रेती जप्त करण्यात आलेली होती. जप्त रेती पोलीस ठाण्यात ठेवण्यात आलेली आहे. जप्त रेतीबाबत मालखान्यात नोंद आहे. जप्त रेतीची मालखान्यात नोंद असल्याबाबत दस्त मी दोषारोपपत्रासोबत दाखल केला आहे. जप्त रेतीची विल्हेवाट लावण्यात आलेली नाही.

४. जप्त ट्रॅक्टर व ट्रॉलीच्या मालकीबाबत परिवहन अधिका–याकडे मी चौकशी केली नाही. साक्षीदार सांगतो की, वाहन नोंदणी प्रमाणपत्र मी तपासादरम्यान प्राप्त केले होते.

५. हे म्हणणे खरे नाही की, जप्त ट्रॅक्टर व ट्रॉली याचेशी आरोपींचा काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०९.०४.२०२२ रोजी आरोपी क्र. १ ला जप्त ट्रॅक्टर व ट्रॉलीसह अवैधपणे रेती वाहतक करत असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटा घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे बयान नोंदवले. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी फिर्याद दिली, खोटा तपास केला व खोटे दोषारोपपत्र दाखल केले आहे व आजरोजी न्यायालयासमोर खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपासणी — आरोपी क्र. २ तर्फे वकिल श्री. मो. जुनेद यांनी आरोपी क्र. १ तर्फे घेण्यात आलेली उलटतपासणी स्विकारली.**

**फेरतपासणी — काही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. १८.१०.२०२५
अकोट

(ए.ए. माळी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र. २)
अकोट, ता. आकोट, जि. अकोला.